खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### प्रा.एस.एन.टाकळकर सेवापूर्ती गौरव समारंभ




प्रा.एस.एन. टाकळकर यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभानिमित्त त्यांचा सत्कार करताना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक कैलास पाचारणे

दैनिक संध्या

# प्रा.एस.एन. टाकळकर हे हाडाचे शिक्षक व शिस्तबध्द प्रशासक

राजगुरूनगर (दै. संध्या) :



प्रा.एस.एन. टाकळकर म्हणजे असंख्य विद्यार्थ्यांच्या मनात गणिताची गोडी निर्माण करणारा हाडाचा शिक्षक असून उपप्राचार्य म्हणूनही त्यांनी शिस्तबद्ध प्रशासन चालवल्याचे गौरवोद्गार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी काढले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.एस. एन.टाकळकर यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात बोलत होते. प्रा.एस.एन. टाकळकर यांनी १९८७ पासून कनिष्ठ महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य केले. ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होत असताना त्यांचा संस्थेच्या वतीने विशेष सेवापूर्ती गौरव समारंभ आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, प्रमोद गानु , हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक कैलास पाचारणे यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी उपस्थित होते. ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी पुढे बोलताना सांगितले, की शिक्षकांचे व्यक्तिमत्व जेवढे प्रभावी, ज्ञानसमृद्ध असेल तेवढे ते विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अधिकचा वेळ देऊन शिक्षक-विद्यार्थ्यांमधील अनुबंध चैतन्यपूर्ण स्वरूपाचे बनवावेत असे आवाहन केले. शिक्षकांच्या विचारातील सकारात्मकता, उत्तुंगतेची आस आणि दुर्दम्य आशावाद विद्यार्थ्यांना जगण्याचे बळ देत असून प्रा.एस.एन.टाकळकर यांनी त्यांच्या कारकिर्दीत याच सूत्रानुसार विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा.एस.एन.टाकळकर यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयात केलेल्या सेवेबद्दल समाधान व्यक्त केले. संस्था व महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त करून अध्यापनाचे कामकाज प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केला असल्याचे ते म्हणाले. सर्व प्राध्यापकांनी निष्ठेने, समर्पणाने विद्यार्थीभिमुख काम करावे अशी भावना व्यक्त केली. या निमित्ताने त्यांनी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाला एक लाख रुपयांची देणगी दिली.

या प्रसंगी संचालक सुरेश टाकळकर, सौ. संजना सुलाब टाकळकर, उपप्राचार्य डॉ.व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा.पी. पी.चव्हाण, प्रा. व्ही.बी.दौंडकर, माजी उपप्राचार्य प्रा.बी.बी. थोरात, प्रा.जी.बी.शिंदे यांच्यासह अनेकांनी मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा धनंजय बोऱ्हाडे यांनी केले.

# प्रा. टाकळकर हाडाचे शिक्षक, शिस्तबद्ध प्रशासक

## ॲड. बुट्टे–पाटील यांचे गौरवोद्गार

राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क



**राजगुरुनगर** : प्रा. एस. एन. टाकळकर म्हणजे असंख्य विद्यार्थ्यांच्या मनात गणिताची गोडी निर्माण करणारा हाडाचा शिक्षक असून उपप्राचार्य म्हणूनही त्यांनी शिस्तबद्ध प्रशासन चालवल्याचे गौरवोद्गार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी काढले. येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. एस. एन. टाकळकर यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात ते बोलत होते.

प्रा. एस. एन. टाकळकर यांनी १९८७ पासून कनिष्ठ महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य केले. ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होत असताना त्यांचा संस्थेच्या वतीने विशेष सेवापूर्ती गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक कैलास पाचारणे यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी सांगितले, की शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व जेवढे प्रभावी, ज्ञानसमृद्ध असेल तेवढे ते विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असते.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**